RNI No. MAHBIL/2009/31748

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक ४६] शुक्रवार, नोव्हेंबर १९, २०१०/कार्तिक २८, शके १९३२ [पृष्ठ १, किंमत : रुपये २०.००

**असाधारण क्रमांक १२०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ नोव्हेंबर २०१०

**आदेश**

**जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी विहित रितीने खर्चाचे हिशोब सादर न केल्यास त्यांना अनर्ह घोषित करण्याबाबतचे अधिकार प्रदान करण्याबाबत.**

क्रमांक रानिआ/जिपपंस. २०१०/प्र.क्र. ९/का-७.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के अन्वये तसेच महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ९ अे (२) व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १० अे (२) अन्वये प्राप्त झालेल्या तसेच या संदर्भातील प्राप्त झालेल्या इतर अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र पुढीलप्रमाणे आदेश देत आहेत :—

(अ) महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील १५ख. (१) व कलम ६२क (१) चे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच कलम १५ख (२) व कलम ६२क (२) चे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

(ब) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ मधील कलम १४ख (१) चे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच कलम १४ख (२) चे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

**चौंद गोयल,**
अपर मुख्य सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.





ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.